## पेपर क्र. ७ राजकीय सिध्दांत (नोटस व बहुपर्यायी प्रश्नसंच)

**Political Theory- MCQ (राजकीय सिध्दांत)**

.............................................................

1) Politics (पोलिटीक्स) हा प्राचीन काळातील ग्रंथ कोणी लिहला? —अरिस्टॉटल

………… is the author of ancient book *the Politics. -Artistotle*

2) 'Theory' (थेअरी) हा शब्द कोणत्या भाषेतून घेण्यात आला आहे—

**-Thea** थिया या लॅटीन शब्दातून घेण्यात आला आहे — म्हणजे दृष्टी किंवा पहाणे

Term Theory is derived from ……… word 'thea'.-*Latin*

3) कोणत्याही दोन प्राचीन ग्रीक तत्ववेत्यांची नावे सांगा. — प्लेटो, अरिस्टॉटल

………… is the ancient Greek Philosopher. -*Plato/ Aristotle*

4) राजकीय सिध्दांताचा स्वरूप काय आहे? — सार्वत्रिक स्वरूप, प्रचीन स्वरूप

The nature of Political Theory is ………… *Universal/Ancient.*

5) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या आदर्शवादी दृष्टीकोण

— व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचा आहे

— मुल्याधिष्ठीत स्वरूपाचा आहे

The normative approach of the study of Poltical Theory is ……

*Subjective and Value Based .*

6) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या अनुभवजन्य दृष्टीकोण

वस्तुनिष्ठ व मुल्यनिरपेक्ष

The empirical approach of the study of Political Theory is ……

*Objective and Value Free.*

7) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे आधुनिक दृष्टीकोण कोणते

— वर्तनवादी दृष्टीकोण, उत्तर वर्तनवादी दृष्टीकोण, मानसशास्त्रीय दृष्टीकोण, व्यवस्था दृष्टीकोण इ.

8) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या वर्तनवादी दृष्टीकोण

— डेव्हीड इस्टन यांनी मांडला आहे

9) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या उत्तरवर्तनवादी दृष्टीकोणाचा जनक कोणास म्हणतात?

— डेव्हीड इस्टन

……… is called as father of Post Behaviouralism - *Davis Easton*

ASG Pol. Sci. Dept. 2023

10) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या वर्तनवादी दृष्टीकोण

— १९५० ते १९६० या काळात अमेरिकन विद्यापीठात मांडला

11) ‘राज्यशास्त्रातील निषेधात्मक अंदोलन म्हणजे वर्तनवादी चळवळ होय’ हे विधान कोणाचे ? — रॉबर्ट डाल

12) वर्तनवादी दृष्टीकोण वैशिष्टे

— नियमीतपणा, पडताळा, मुल्यनिरपेक्षता, संख्यात्मकता, शास्त्रशुध्द संशोधन इ.

13) लोकशाहीत सत्तेचे अधिसत्तेचे उगमस्थान कोण असते

— जनता, लोक, लोकमत

In Democracy ……….. are the source of power or authority. - *People*

14) जिल्हाधिकारी कोणत्या प्रकारच्या अधिसत्तेचा वापर करतो? — वैधानिक विवेकी

The Collector exercises …… type of authority. - *Legal Rational*

15) राजा कोणत्या प्रकारच्या अधिसत्तेचा वापर करतो ?

— पारंपरिक अधिसत्ता

The King exercises …… type of authority.- *Traditional*

16) दिव्यवलयी अधिसत्तेचा वापराचे उदाहरण सांगा—

— म. गांधी, जयप्रकाश नारायण इ. नेते

……… is the examples of charismatic type of authority.- *Mahatma Gandhi*

17) मॅक्स वेबर यांनी अधिसत्तेचे किती व कोणते प्रकार सांगितेले आहेत

— तीन प्रकार— वैधानिक विवेकी अधिसत्ता , पारंपरीक अधिसत्ता , दिव्यवलयी अधिसत्ता

…….. has advocated three types of authority.- *Max Weber*

18) ‘काय असले पाहिजे’ अशी मांडणी

— राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या आदर्शवादी दृष्टीकोणातून करण्यात आली

…………. Is the concern of the normative approach to the study of Political Theory. - *What ought to be*

19) राज्यशास्त्राला कोणी मास्टर सायन्स —शास्त्रांचे शास्त्र असे म्हटले

— ग्रीक तत्ववेत्ता अरिस्टॉटलने यांनी

20) ‘काय आहे’ अशी मांडणी

— राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या अनुभवजन्य दृष्टीकोणातून करण्यात आली

…………. Is the concern of the empirical approach to the study of Political Theory. - ‘*What is’*

ASC Pol.Sci. Dept. 2023

21) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा अनुभवजन्य दृष्टीकोण

— वस्तूनिष्ठ स्वरूपाचा आहे

— मुल्यनिरपेक्ष स्वरूपाचा आहे

22) राजकीय सिध्दांताची व्याप्ती सांगा?

— राजकीय विचारप्रणाली, राजकीय व्यवस्था, राजकीय विचारवंत, राजकीय ग्रंथ इ

23) 'राजकीय सिध्दांताचा ऱ्हास' याबाबत कोणी विचार मांडले? — डेव्हीड ईस्टन

…… has put forth the idea of 'Decline of Political Theroy'.- *David Easton*

24) 'मॉडर्न पोलिटीकल ॲनलायसिस' हे पुस्तक कोणाचे? — रॉबर्ट डाल

25) 'सामुहीक इहा' हे पुस्तक कोणाचे? — रूसो या फ्रेच तत्ववेत्ता

26) 'दास कॅपिटल' हे पुस्तक कोणाचे? — कार्ल मार्क्स या विचारवंताचे

27) 'Political Man' हे पुस्तक कोणाचे? — एस एम लिपसेट

……………………………………………………………

**घटक (१) राजकीय सिध्दांत— अर्थ, व्याख्या, स्वरूप**

**प्रास्ताविक —**

राज्यशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. प्रचीन काळापासून राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास केला जातो. ग्रीक तत्ववेत्ता अरिस्टॉटल यांनी दोन हजार वर्षापूर्वी राज्यशास्त्र या विषयाची वैज्ञानिक मांडणी केली. या विषयात कायदा, लोकप्रशासन, राष्ट्रीय राजकारण, आंतराष्ट्रीय संबंध, तुलनात्मक राजकारण, राजकीय सिध्दांत, राजकिय प्रक्रिया, सार्वजनिक धोरण निश्चिती, राजकीय संस्था इत्यादी उप विषयांचा समावेश केला जातो.

**राजकीय सिध्दांत : अर्थ, व्याख्या स्वरूप आणि व्याप्ती —**

राजकीय सिध्दांताचा विचार करण्यापूर्वी सिध्दांत म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. सिध्दांत म्हणजे घटनांचा परस्पर संबंध जाणून घेणारा दृष्टीकोन होय. 'थिअरी' हा शब्द ग्रीक शब्द 'थिआ' या शब्दापासून निर्माण झालेला आहे. Thea म्हणजे 'दृष्टी' किंवा 'दृश्य पाहणे होय'. सिध्दांत म्हणजे घटनांचा परस्पर संबंध आणि वास्तवता जाणून घेणारा दृष्टिकोन होय.

मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडविण्याचा केलेला प्रयन्त म्हणजे राजकीय सिध्दांत होय. राजकीय सिध्दांतामध्ये तत्वज्ञान, विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मूलतत्वाच्या आधारे बौध्दीक मांडणी केलेली असते. काळानुसार आणि परिस्थितीनूसार राजकीय सिध्दांतावर त्या काळातील संस्कृतीचा प्रभाव पडलेला असतो.

ASSG Pol. Sci. Dept. 2023

राजकीय सिध्दांताच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या वेगवेगळया पध्दतीने केल्या आहेत. त्य पुढील प्रमाणे—

**व्याख्या —**

१) **ॲंड्रयू हॅकर** — यांनी आपल्या Political Theory या ग्रंथात राजकीय सिध्दांताची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. 'ज्या तत्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकलनामुळे आम्ही राहत असलेल्या वर्तमानकालीन आणि भविष्याकालीन जगाविषयीची आमची समजूत वाढते त्यास राजकीय सिध्दांत असे म्हणतात.'

२) **सेबाईन** — 'राजकीय सिंध्दांत' ही एक बौध्दिक परंपरा आहे. इतिहासत मानवाने काळाच्या आघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले, त्या राजकीय प्रश्नांची शिस्तबध्द बौध्दिक मांडणी केली, ते विचार भविष्यकाळात मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात. त्यास राजकीय सिध्दांत असे म्हटले आहे.

सेबाईन यांच्या मते कोणताही राजकीय सिध्दांत घेतला तर त्यामध्ये पुढील तीन प्रमुख गोष्टी आढळतात.

अ) **वस्तुनिष्ठ मांडणी**— ज्या घडामोडींना ज्या परिस्थितीने किंवा विशिष्ट प्रसंगाने सिध्दांत उदयास येतो ती वस्तुस्थिती

**ब) कार्यकारणसंबंध** — स्थूलमानाने राजकीय सिध्दांताच्या निर्मितीची कारणमींमांसा करणे. इतिहासात राजकीय व सामाजिक पेचप्रसंग निर्माण होतात ते सोडविण्यासाठी राजकीय सिध्दांत उदयाला येतात.

**क) मुल्य आधारीत मापन —** अमुक एक गोष्ट घडणे योग्य होईल की नाही या विषयाचे मूल्यात्मक प्रतिपादन

राज्याच्या उदयाचे सिध्दांत, राज्याच्या स्वरूपाचे सिध्दांत, राज्याच्या सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे सिंध्दांत इत्यादी अभ्यासले असता त्यामध्ये सबाईनने सांगितलेल्या वस्तुनिष्ठता, कार्यकारण संबंध आणि मूल्यात्मक प्रतिपादन या तीन गोष्टी आढळून येतात. राजकीय तत्वज्ञान आणि सिध्दांत या दोन संकल्पना परस्परांना पूरक असतात. राजकीय तत्वज्ञानाचे व्यवहारीक स्वरूप म्हणजे राजकीय सिध्दांत होय. राजकीय सिध्दांतात कोणत्या ना कोणत्या तत्वांचा पुरस्कार केलेला असतो. राजकीय तत्वज्ञानात राजकीय व्यवस्थांचा, राजकीय गोष्टीचा विचार करून निश्चित असे निकर्ष काढले जातात. प्रत्येक राजकीय सिध्दांत विशिष्ट तत्वप्रणालीचा, तत्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी निर्माण झालेला असतो. राजकीय सिंध्दाताला तत्वज्ञानाची, आदर्श मूल्यांची, तत्वांची, बैठक असावीच लागते. आदर्श मूल्ये, तत्वे यांची जोड राजकीय सिध्दांताला द्यावीच लागते.

**राजकीय सिध्दांताच्या अभ्यासाची क्षेत्रे (व्याप्ती)**

ASSG Pol. Sci. Dept. 2023

१) राजकीय विचारप्रणालीचा अभ्यास — राजकीय विचारप्रणालीचा अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो. समान्यतः एकाच राजकीय व्यवस्थेत एकच राजकीय विचारप्रणाली प्रभावी असेल तर राजकीय सिध्दांचे स्वरूप आधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येते. परंतु एकाच राजकीय व्यवस्थतेत एकापेक्षा जास्त विचारप्रणाली अस्तित्वात असतील तर त्या राजकीय व्यवस्थेला आधारभूत असलेला राजकीय सिध्दांत स्पष्ट करणे कठीण होऊन बसते. उदा. इंग्लंडच्या संसदीय लोकशाही व्यवस्थेवर उदारमतवाद, व्यक्तीवाद, लोकशाही समाजवाद इत्यादी विचारप्रणालींचा प्रभाव पडलेला असल्यामुळे विविध राजकीय विचारप्रणालींचा अभ्यास करणे भाग पडते.

**२) राजकीय व्यवस्थांचा अभ्यास —**सामान्यतः राजकीय सिध्दांत एखादया विशिष्ट राजकीय व्यवस्थेचे स्पष्टीकरण व समर्थन करीत असतो. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला असता विविध राजकीय सिध्दांताचे ज्ञान होऊ शकते. उदा. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाही शासनपध्दतीचा अभ्यास केला असता अमेरिकन राज्यघटनेने सत्ता विभाजनाचा सिंध्दात कसा स्वीकारलेला आहे हे समजून येते.

**३) राजकीय ग्रंथाचा अभ्यास**— विविध राजकीय विचारवंतानी आतापर्यंत केलेले ग्रंथ लेखनाचे कार्य अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते. प्लेटो (रिपब्लिक ,स्टेटसमन. दि लॉज), अरिस्टॉटल, (पॉलिटिक्स), मॅकियाव्हेली (दि प्रिन्स), मॉटेस्कयू (स्पीरिट ऑफ लॉज) इत्यादी विचारवतांनी जे राजकीय ग्रंथ लिहिले त्या ग्रंथांच्या अभ्यासावरून राजकीय सिध्दांताचे ज्ञान मिळू शकते. या शिवाय ऐतिहासिक स्वरूपाचे दस्ताऐवज, करारनामे, जुने ग्रंथ यांच्या अभ्यासातून राजकीय सिध्दांतांची माहिती मिळू शकते.

**राजकीय सिध्दांताची वैशिष्टये**

राजकीय सिध्दांताचे परीक्षण करताना पुढील वैशिष्टये (लक्षणे) त्या सिध्दांतात आहेत किंवा नाहीत याचा साकल्याने विचार करावा लागतो. सामान्यतः राजकीय सिध्दांतामध्ये पुढील लक्षणे कमी अधिक प्रमाणात आढळतात.

१) राजकीय सिध्दांत विशिष्ट राजकीय व्यवस्थेचा पुरस्कार करतात.

२) राजकीय सिध्दांताव्दारे राजकीय व्यवस्थात विशिष्ट राजकीय विचारप्रणालींचा पुरस्कार केला जातो.

३) राजकीय सिध्दांतात गृहीत धरलेली मूल्ये, तत्वे, यांची चर्चा आणि निकर्ष स्पष्ट व स्वतंत्र असावे लागतात.

४) राजकीय सिंध्दातातील निष्कर्ष हे तत्व आणि व्यवहार यात समन्वय साधून काढलेले असतील तर ते सामाजिक व राजकीय परिस्थितीशी अधिक जुळणारे व सुसंगत ठरतात.

ASSG Pol. Sci. Dept. 2023